**<u>नियमित दिवाणी दावा क्र.०८/२०१३.</u>**

**निशाणी क्र.५**

**<u>:: तूर्तातूर्त मनाई अर्जावरील आदेश ::</u>**

( दिनांक ०१.०७.२०१४ )

१. वादी यांनी हा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांच्याविरूध्द त्यांनी वादी व प्रतिवादी क्र.२ ते १५ यांचा दावा मिळकतीवरील शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत व अडथळा करू नये यासाठी दाखल केला आहे.

*<u>वादीचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे :–</u>*

२. वादी व प्रतिवादी क्र. २ ते १५ यांचे पूर्वज काशीनाथ रामचंद्र विठ्ठलदास व इतर हे खालील नमूद दावा मिळकतीचे मालक व वहिवाटदार, कब्जेदार होते. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:–

पंढरपूर शहर, ता.पंढरपूर, जिल्हा सोलापूर हद्दीतील भुखंड मिळकत नगरभूमापन क्र.७७, एकुण क्षेत्र १हे.४५आर.(१ हे.४०आर.पोट खराब ५).

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | : | तलाव |
| दक्षिणेस | : | तलाव |
| पश्चिमेस | : | तलाव व भूखंड क्र.८९, व ८३. |
| उत्तरेस | : | भू.क्र.७६ व ७८ |

(सदर मिळकतीस यापुढे दावा मिळकत असे संबोधणेत येईल.)

३. सदर दावा मिळकत ही मयत काशिनाथ रामचंद्र विठ्ठलदास व त्यांचे वंशावळीत नमूद भावकीतील व्यक्ती एकत्रितपणे वहिवाट करीत होते. सन १९०० पासून दावा मिळकतीचे कांही क्षेत्र हे गवतपड होते व उर्वरित क्षेत्र वादीचे पूर्वजांच्या वहिवाटीत होते. मात्र वादी व प्रतिवादी क्र.२ ते १५ यांच्या पूर्वजांना महसूल पत्रकांविषयी फारसे ज्ञान नव्हते व त्यामुळे दावा मिळकतीचे वहिवाटदार सदरी १.कोंडी म्हातारजी माळी, २.धोंडी म्हातारजी माळी व ३.गेनू, रंभाजी, हारी,

यमाजी, नाना महादू, ग्यानू, तात्या, गीता, कोम, साधु नारायण, संतु दगडू वगैरे ८ ते ९ लोक यांच्या नांवांच्या पोकळ व बोगस नोंद करून घेण्यात आली. तसेच त्यानंतर त्यातील मयत व्यक्तीचे वारसांची नांवे दावा मिळकतीचे ७/१२ पत्रकाला लावणेत आली. हे सर्व फेरफार चुकीचे आहेत. तसेच वादी क्र.१ ते ३ व ५ ते १० हे दावा मिळकतीचे देखरेख करीत आहेत व इतर सर्व वादी व प्रतिवादी क्र.२ ते १५ यांचादेखील उपरोक्त वादींकरवी दावा मिळकतीवर ताबा आहे.

४. मात्र केवळ दावा मिळकतीचे ७/१२ ला वादी व प्रतिवादी क्र.२ ते १५ यांची नोंद महसूल पत्रकात नसल्यामुळे दिनांक २८.०३.२०१३ रोजी प्रतिवादी क्र.१ महाराष्ट्र शासन यांचे प्रतिनिधी गांव कामगार तलाठी व इतर सरकारी नोकर यांनी तारेचे कुंपण करण्याच्या हेतूने दावा मिळकतीमध्ये बेकायदेशीरपणे प्रवेश केला आणि वादी क्र.४ यांच्या वहिवाटीतील पत्राशेड उचकटून टाकणेचा प्रयत्न केला. त्यावेळी उपरोक्त व्यक्तीने प्रतिबंध करणेचा प्रयत्न केला असता ही जागा सरकारचे मालकीची आहे व जिल्हाधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे वाहनतळ करणेचे नियोजिले आहे आणि आम्ही दोन दिवसात वाहनतळ करणार आहे, अशी धमकी सरकारचे प्रतिनिधीने दिल्यामुळे वादीने हा दावा दाखल केला आहे. तसेच दाव्याचा निकाल लागण्यासाठी बराच कालावधी लागणार असल्यामुळे प्रतिवादी क्र. १ यांनी किंवा त्यांच्या हस्तकांनी दावा मिळकतीत बेकायदेशीरपणे कब्जा करून तारेचे कुंपण व वाहनतळ करू नये, यासाठी वादीने हा अर्ज दाखल केला आहे.

*प्रतिवादी क्र. १ यांचे म्हणणे निशाणी ३० संक्षिप्त स्वरूपात खालीलप्रमाणे:–*

५. प्रतिवादी क्र.१ महाराष्ट्र सरकार यांनी दावा मिळकतीमध्ये वाहनतळ करण्याचा कधीही प्रस्ताव नियोजित केलेला नाही. तसेच दाव्यात कथन केल्याप्रमाणे दिनांक २८.०३.२०१३ रोजीचे दाव्यास कसलेही कारण घडलेले नाही. प्रतिवादी क्र.१ किंवा त्यांचेकरवी इतर कोणीही दावा मिळकतीत कधीही प्रवेश केलेला नाही व वाद पत्रात नमूद केलेप्रमाणे दावा मिळकतीमध्ये तारेचे कुंपण किंवा वाहनतळ करण्यासाठी कसलेही कामदेखील केले नाही. मुख्य म्हणजे वादी व प्रतिवादी क्र.२ ते १५ यांचा दावा मिळकतीवर कसलाही कबजा नव्हता व नाही, त्यामुळे केवळ

दावा मिळकत गिळंकृत करणेच्या हेतूने बनावट कारणे दाखवून प्रतिवादी क्र. १ यांच्या विरूध्द अकारण आदेश प्राप्त करणेचा वादींचा प्रयत्न आहे. दावा मिळकतीत ज्या व्यक्तींचा ताबा आहे, त्या व्यक्तींना दाव्यात आवश्यक पक्षकार न करता, प्रतिवादी क्र.१ यांच्या विरूध्द सदर मनाई हुकूम आदेश मिळवून त्याचा गैरफायदा घेवून उपरोक्त व्यक्तींना दावा मिळकतीतून बेदखल करण्याचा वादीचा प्रयत्न आहे. अशा प्रकारे वादीच्या हक्कात सकृतदर्शनी प्रकरण नाही, आणि त्यामुळे वादीचा अर्ज खर्चासह फेटाळणेत यावा, अशी प्रतिवादी क्र. १ यांनी विनंती केली आहे.

६. प्रतिवादी क्र.२ ते १५ यांनी निशाणी २७ नुसार कैफियत दाखल करून वादीचा दावा/अर्ज मंजूर करणेत यावा असे म्हणणे दिले आहे.

७. सदरकामी प्रकरणाची कागदपत्रे अभ्यासली, वादीचे विद्वान विधिज्ञ श्री.के.एम.घाडगे व प्रतिवादी क्र.१ तर्फे सहा. सरकारी वकील वांगीकर यांचा समग्र युक्तीवाद ऐकला,त्यावरून खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले ते मुद्दे त्यावरील निष्कर्ष व त्याची कारणमिमांसा खालीलप्रमाणे : —

| ***अ. क्र.*** | ***मुद्दे*** | ***निष्कर्ष*** |
|---|---|---|
| १ | वादी यांच्या अर्जातील मागणीप्रमाणे तूर्तातूर्त मनाई दाद देणे योग्य त्यांच्या कथनामध्ये सकृतदर्शनी तथ्य असलेचे सिध्द होत आहे का? | 'नकारार्थी' |
| २. | सोयीचे समतोलत्व वादीच्या बाजूने आहे का? | 'नकारार्थी' |
| ३. | अर्जात मागणी केल्याप्रमाणे तूर्तातूर्त मनाई आदेश न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे का ? | 'नकारार्थी' |
| ४ | काय आदेश? | 'अंतिम आदेशाप्रमाणे' |

## :: **कारणमिमांसा** ::

८. या प्रकरणी वादीने त्यांच्या हक्कात सकृतदर्शनी प्रकरण असल्याचे सिध्द करणेसाठी

निशाणी ४ सोबत वर्ष १९२७–२८ ते चालू वर्ष म्हणजेच सन २०१२–१३ वर त्यांच्या दावा मिळकतीचे ७/१२ उता–याच्या प्रमाणित प्रती सादर केल्या आहेत. उपरोक्त कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसते की, वादीचे पूर्वज काशीनाथ रामचंद्र विठ्ठलदास व त्यांनतर त्यांचे वारसांची नोंद मालक सदरी नोंदविणेत आलेली आहेत. तसेच वर्षे सन १९९९–२००० पासून साधारणतः सर्व वादी व प्रतिवादी क्र.१ व २ ते १५ यांच्या नांवे दावा मिळकतीची मालक सदरी दिसून येतात.

९. मात्र उपरोक्त कागदपत्रांचे अवलोकनानंतर ही बाब तत्काळ स्पष्ट होते की, कोंडी म्हातारजी माळी, धोंडी म्हातारजी माळी, गेनू, रंभाजी, हारी व त्यानंतर त्यांचे वारस यांची नांवे उपरोक्त ७/१२ च्या मालक सदरी स्पष्ट दिसून येतात. तसेच वर्षे सन १९२७–२८ ते सन १९७४–७५ पर्यंत उपरोक्त माळी व्यक्तींचे वारसांची नावे दावा मिळकतीचे ७/१२ सदरी आहेत व मालकी ही ज्या व्यक्तींच्या नांवे आहेत त्याच सर्व व्यक्तींचा ताबा दावा मिळकतीवर असल्याचे दिसते. सबब, दावा मिळकतीवर केवळ वादी व प्रतिवादी क्र.२ ते १५ यांचाच ताबा आहे व दावा मिळकत त्यांच्याच शांततामय कबजे वहिवाटीत आहे, ही बाब वादीला सकृतदर्शनी सिध्द करता आले नाही.

१०. तसेच दावा मिळकतीवर केवळ वादी व प्रतिवादी क्र.२ ते १५ यांचा ताबा असल्याची बाब सिध्द करणेसाठी वादीतर्फे दावा मिळकतीच्या लगत असलेल्या किंवा जवळपासच्या एकाही व्यक्तीचे शपथपत्र सादर केलेले नाही, त्यामुळे वादींना त्यांच्या व प्रतिवादी क्र.२ ते १५ यांचा दावा मिळकतीवरील ताबा सकृतदर्शनी सिध्द करता आलेला नाही. याउलट प्रतिवादी क्र. १यांचे असे कथन आहे की, त्याच्यातर्फे किंवा त्यांच्या हस्तकांनी दावा मिळकतीमध्ये वाहनतळ करण्याचा कधीही प्रस्ताव नियोजित केलेला नव्हता आणि त्याचमुळे दिनांक २८.०३.२०१३ रोजी सरकारचे प्रतिनिधीने दावा मिळकतीमध्ये प्रवेश केला नाही, व वादी क्र.४ ला वाहनतळ करणेबाबत धमकीदेखील दिली नाही. वादींनी नमूद केलेली उपरोक्त घटना ही पूर्णपणे

कपोलकल्पित आहे. एकंदरीत प्रकरणाची वस्तुस्थिती पाहता प्रतिवादी क्र.१ चा बचाव हा निश्‍चितच जास्त शक्य वाटतो कारण दिनांक २८.०३.२०१३ रोजी उपरोक्त घटना घडल्याच्या कथनाला दुजोरा देण्यासाठी लगतच्या किंवा आसपासच्या एकादेखील साक्षीदाराचे शपथपत्र याकामी वादींतर्फे दाखल करण्यात आलेले नाही.

११. सबब दावा मिळकत ही वादींच्या ताब्यात आहे ही बाब वादींना सकृतदर्शनी सिध्द करता आलेली नाही. त्यावर इतर लोकांचादेखील ताबा असल्याचे दिसते. सबब, केवळ त्यांना त्रास देणेच्या हेतूने त्या व्यक्तींना आवश्यक पक्षकार न करता प्रतिवादी क्र.१ विरूध्द मनाई आदेश प्राप्त करून दावा मिळकतीवरील इतर कबजेदार लोकांना बेदखल करणेचा प्रयत्न केला जाईल. हा प्रतिवादी क्र.१ तर्फे करणेत आलेला युक्तीवाद शक्य वाटतो. मुख्य म्हणजे वादींना दाव्यास घडलेले कारण निश्‍चितच सिध्द करता आले नाही. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता वादीच्या हक्कात सकृतदर्शनी प्रकरण नसल्याचे स्पष्ट होते व त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष 'नकारार्थी' देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करिता:–</u>**

१२. मुद्दा क्र. १ चा नकारार्थी निष्कर्ष पाहता ही बाब नमूद करावी लागते की दाव्याचे कारणच सिध्द न करता आल्यामुळे व वादींच्या हक्कात सकृतदर्शनी प्रकरण नसल्यामुळे त्यांच्या हक्कात सोईचे समतोलत्व दिसून येत नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष 'नकारार्थी' देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ करिता :–</u>**

१३. उपरोक्त दोन्ही मुद्यांचा नकारार्थी निष्कर्ष पाहता ही बाब स्पष्ट दिसते की, प्रतिवादी क्र.१ यांनी दावा मिळकतीमध्ये त्यांचेकरवी वादीच्या दावा मिळकतीवरील कथित हरकत, अडथळा करू नये तसेच प्रतिवादी क्र. १ यांनी दावा मिळकतीमध्ये कसलाही वाहनतळ करणेचा प्रस्ताव केल्याचेदेखील दिसून येत नाही. महत्वाचे म्हणजे प्रतिवादी क्र. १ ही एक सरकारी संस्थ असून जर

दावा मिळकतीमध्ये अशा प्रकारचे वाहनतळ उभारणेची त्यांना गरज भासलेस त्यांनी कायदेशीर मार्गाचा अवलंब करूनच दावा मिळकतीचा ताबा घ्यावा लागेल, व त्यामुळेच वादीला या क्षणी तरी कसलेही अपरिमित नुकसान होण्याची शक्यता दिसून येत नाही, त्यामुळे जरी वादीच्या हक्कात मागणीप्रमाणे तुर्तातूर्त मनाई हुकूम आदेश दिला नाही तरी वादींना कसलेही अपरिमित नुकसान होणार नाही, म्हणून मी मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष 'नकारार्थी' देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ करिता:–</u>**

१४. मुद्दा क्र. १ ते ३ चा निष्कर्ष विचारार्थ घेता मी मुद्दा क्र. ४ चा निष्कर्ष खालीलप्रमाणे देत आहे.

**// <u>आदेश</u> //**

१. अर्ज निशाणी क्र.५ खर्चासह फेटाळण्यात येत आहे.

स्थळ : पंढरपूर.
दिनांक : ०१.०७.२०१४.

**(हे.भा.सिरसाळकर)**
सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, पंढरपूर.